**<u>बार्क्लेज बँक पीएलसी-इंडिया च्या सेवा व सुविधांची माहिती देणारी पुस्तिका</u>**

आमच्या सर्व शाखांत ग्राहकांना खालील उत्पादने देऊ केली जातील:

**<u>बचत खाते</u>**

सरासरी तिमाही शिल्लक ( ॲव्हरेज क्वार्टरली बॅलन्स- एक्युबी) : रु २००,०००

*<u>वैशिष्ट्ये</u>*
नि:शुल्क पेयेबल ॲट पार धनादेश (चेक)
नि:शुल्क क्लासिक डेबिट कार्ड
भारतातील कोणत्याही बँकेच्या व्हिसा/व्हिसा प्लस एटीएम मध्ये पैसे काढण्याचे नि:शुल्क अमर्यादित व्यवहार
नि:शुल्क तिमाही खाते स्टेटमेंट
भारतातील बार्क्लेज शाखांमध्ये देय नि:शुल्क डिमांड ड्राफ्ट्स
निंशुल्क एसएमएस अलर्ट्स

**<u>मूलभूत बचत बँक जमा खाते/प्रधानमंत्री जन धन योजना खाते</u>**

*<u>वैशिष्ट्ये</u>*
शून्य शिल्लक खाते
नि:शुल्क पेयेबल ॲट पार धनादेश पुस्तिका (चेक बुक)
नि:शुल्क क्लासिक डेबिट कार्ड
नि:शुल्क तिमाही खाते स्टेटमेंट
निंशुल्क एसएमएस अलर्ट्स

**<u>चालू खाते</u>**
सरासरी तिमाही शिल्लक ( ॲव्हरेज क्वार्टरली बॅलन्स- एक्युबी) : रु १५,००,०००

*<u>वैशिष्ट्ये</u>*

नि:शुल्क पेयेबल ॲट पार धनादेश
नि:शुल्क तिमाही खाते स्टेटमेंट
भारतातील बार्क्लेज शाखांमध्ये देय नि:शुल्क डिमांड ड्राफ्ट्स
स्थानिक धनादेश स्वीकृती आणि पेमेंट्स

**<u>डेबिट कार्डचे प्रकार</u>**
१) क्लासिक डेबिट कार्ड: या कार्डावर भारतीय रुपये ५०,००० ची दैनंदिन व्यवहार मर्यादा आहे. फक्त अंतर्देशीय व्यवहार देऊ केले जातात.
२) प्लॅटिनम कार्ड: या कार्डावर भारतीय रुपये २००,००० ची दैनंदिन व्यवहार मर्यादा आहे. या कार्डावर अंतर्राष्ट्रीय व्यवहार देखील देऊ केले जातात.

**<u>मुदत ठेव खाते</u>**

वैशिष्ट्ये
तुम्ही किमान रु. १०,००,००० या रकमेने बार्क्लेज मुदत ठेव खाते उघडू शकता.
सरळ किंवा आवर्ती व्याज जमा- तुमच्या बचत खात्यात तिमाही पध्दतीने व्याज जमा करता येते किंवा मेच्युरिटी पर्यंत तुमच्या मुदत ठेव खात्यात त्याची पुनर्गुंतवणूक करता येते.
मेच्युरिटी नंतर मुदत ठेव खात्याचे आपोआप नूतनीकरण
स्त्रोतावर कर वजावट (टीडीएस)
प्रत्येक आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस प्रत्येक बँक खात्यासाठी बँकेस दिलेल्या सवलत प्रमाणपत्राव्यतिरिक्त, उत्पन्न कर नियमांनुसार ठेवींवर टीडीएस लागू होतो.

## <u>अनिवासी भारतीय बँकिंग</u>

**<u>अनिवासी भारतीय सामान्य (एनआरओ) मुदत ठेवी</u>**

*<u>वैशिष्ट्ये</u>*
तुम्ही किमान रु १० लाख या रकमेने बार्क्लेज मुदत ठेव खाते उघडू शकता.
मुद्दल आणि व्याज रकमा भारतातील करांच्या कपातीनंतर परत केल्या जातात.
किमान मुदत ७ दिवस व कमाल मुदत ७ वर्षे आहे.

**<u>अनिवासी भारतीय सामान्य (एनआरओ) बचत खाते</u>**

*<u>वैशिष्ट्ये</u>*
प्रारंभिक शिल्लक रु १०,००,००० व सरासरी तिमाही शिल्लक रु १०,००,०००
तुम्ही आणि तुमच्या आदेश धारकासाठी नि:शुल्क एटीएम  कार्ड
भारतातील २५००० पेक्षा अधिक कॅशनेट एटीएम मध्ये तुमचे पैसे काढण्याची नि:शुल्क सुविधा
नि:शुल्क पेयेबल ॲट पार धनादेश पुस्तिका
भारतातील बार्क्लेज शाखांमध्ये देय नि:शुल्क डिमांड ड्राफ्ट्स
नि:शुल्क तिमाही स्टेटमेंट
निंशुल्क एसएमएस अलर्ट्स

**<u>अनिवासी भारतीय बाह्य(एनआरई) मुदत ठेवी</u>**

*<u>वैशिष्ट्ये</u>*
रु १,०००,००० एवढ्या कमी रकमेत अनिवासी बाह्य (एनआरई) मुदत ठेव खाते उघडा.
१२ महिन्यांच्या आत मुदतपूर्व बंद केल्यास ठेवींवर व्याज देय नाही.
किमान मुदत १ वर्ष आहे आणि कमाल मुदत ७ वर्षे आहे.
भारतात व्याजाच्या उत्पन्नावर कर लावला जात नाही.
आकर्षक व्याज दर.
मुद्दल आणि व्याज रकमा परत करण्यास पूर्णत: पात्र आहेत.

**<u>विदेशी चलन अनिवासी (एफसीएनआर) ठेवी</u>**

*<u>वैशिष्ट्ये</u>*
विदेशी चलन अनिवासी (एफसीएनआर) ठेवी जीबीपी, युरो आणि युएसडी मध्ये संचलित करता येतात.
जीबीपी १५,०००/युरो १७,०००/युएसडी २५,००० एवढ्या कमी रकमेत ठेव खाते उघडा.
व्याजाच्या उत्पन्नावर भारतात कर लावला जात नाही.
किमान मुदत १ वर्ष आणि कमाल मुदत ५ वर्षे आहे.
मुद्दल आणि व्याज रकमा परत करण्यास पूर्णत: पात्र आहेत.

**<u>नामनिर्देशन (नॉमिनेशन)</u>**
आम्ही नामनिर्देशन सुविधा देऊ करतो.

**<u>पासबुक्स</u>**

आम्ही बचत खात्यांसाठी पासबुक देऊ करतो.

**<u>आरटीजीएस/एनइएफटी</u>**
आमच्या ऑन-लाइन चॅनल्स आणि शाखा चॅनल्स मध्ये आरटीजीएस/एनइएफटी व्यवहार सुविधा उपलब्ध असेल.

**<u>वरिष्ठ नागरिक आणि दिव्यांगांसाठी बँकिंग सेवा</u>**

विविध बँकिंग सेवांचा वापर सहजतेने करण्यासाठी वरिष्ठ नागरिक आणि दिव्यांग व्यक्तींना आमचे सेवा व्यवस्थापक शक्य असेल ती मदत देऊ करतील. आमच्या सर्व शाखांत वरिष्ठ नागरिक आणि दिव्यांगाना प्राधान्य दिले जाते.
स्वत:ची स्वाक्षरी किंवा व्यवहार करू शकत नाहीत अशा आजारी, वृध्द, अपंग आणि दृष्टीने बाधित ग्राहकांना आम्ही अतिरिक्त बँकिंग सेवा देऊ करतो.